Registered with RNI BHAVMALA

MAHABIL 06842/2013 Year-9, Issue-34, - July-Aug-Sept. 2022

Printed Book/Periodicals
Book-Pocket

प्रति,
श्री./श्रीमती प्रा. डॉ. दिनेशचंद्र राऊत
अक.

If Undelivered return to :

**प्रेषक :-**
**प्रो.डॉ. प्रल्हाद वावरे**
संपादक, भावमाला
ग्रीन पार्क-१, श्रीरामपूर,
पुसद, जि. यवतमाळ (महा.) ४४५२१५

2022 - 2023

www.bhavmala.com ISSN2395-0366

# भावमाला

वर्ष-९ वे, अंक-३४, जुलै - ऑगस्ट - सप्टेंबर २०२२

• संपादक - प्रो.डॉ. प्रल्हाद वावरे •



## अंतरंग

- **शोध निबंध-**


१) ज्योती लांजेवार यांची दलित स्त्रीवादी कविता - डॉ. वर्षा गणगणे
२) एका भारतीयाचे सर्जनशील आत्मचरित्र - डॉ. अतुल टेवरे
३) डॉ. सुभाष सावरकर यांच्या जजमेंटचे स्थूल अवलोकन - डॉ. दिनेशचंद्र राऊत
४) निष्काम कर्मयोगी संत गाडगेबाबा - डॉ. शरद वाघोळे
५) साहित्यिक डॉ. रविकिरण पंडित - डॉ. प्रल्हाद वावरे


- **परिक्षणे / प्रतिक्रिया -**


१) विषमताबाधीत समाजव्यवस्थेत मानवी मूल्य रूजविणारी कविता - दिगंबर झाडे
२) एका संघर्षाची कथा - योगीराज वाघमारे
३) राजकवने: जीवनानुभूतीची सकस अभिव्यक्ती - अरूण विघ्ने
४) शेतकऱ्याच्या पोराची संघर्षमय गाथा- काटेरी पायवाट - विरभद्र मिरेवाड
५) गुगलबाबा-वेधक बालकवितांचा संग्रह - डॉ. कैलास दौड
६) आपण म्हणतो..... - सौ. वंदना कुळकर्णी


- **कथा / ललित -**


१) विचार (संकलन) - चि. ओंकार मनिष व्यवहारे
२) घरकैलारू - डॉ. प्रल्हाद वावरे


- **नव्या पुस्तकांची ओळख -**


१) मोहोरपाला - गोपाल शिरपूरकर
२) प्रश्नांची मातृभाषा - डॉ. युवराज सोनटक्के
३) अधरोपर खिली मुस्कान (हिन्दी) - सदाशिव गाडे


- **कविता-**


१) गुज सृष्टीचे - सौ. भारती सावंत
२) काव्यछलाका - सौ. भारती सावंत
३) स्री - सौ. वंदना विंचूरकर
४) कृपा - राजेश चौरपगार
५) पोवाडा - गणेश लोणकर
६) यादे (हिंदी) - सदाशिव गाडे
७) देवा तुझ्या... - विठ्ठल जाधव
८) एक छोटी ज्वलंत कविता - डॉ. कैलास दौड
९) माणूसपण - प्रा. रमेश वाघमारे
१०) जूना शिरस्ता मोड म्हणालो - संतोष उईके
११) जन्मभूमि - डॉ. राज यावलीकर
१२) उपकार - विजय बिन्दोड
१३) आयुष्य - दिनेश मोडोकार
१४) काळ अमुचा - प्रा. राजाराम बनसकर
१५) पानगळ - प्रा. सुनिल तोरणे
१६) रक्त - सुनिल लव्हाळे
१७) घन बरसून आले - अशोक लोटणकर


हा अंक प्रकाशक, मालक प्रा.डॉ. प्रल्हाद वावरे यांनी मिलेश प्रिन्टर्स, आठवडी बाजार, पुसद येथे छापून ग्रीन पार्कक्र. १ येथे खाजगी वितरणासाठी प्रकाशीत केला. या त्रैमासिकातील लेखकांनी लिहिलेल्या मतांशी संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. सर्व वादविवाद पुसद न्यायालयाअंतर्गत राहील.



## संपादकीय....

मित्रांनो,

भावमालेचा चौथीसावा अंक आपले हाती देतांना अत्यानंद होतो आहे, साहित्य चळवळ ही मानवकेंद्रीत असावी आणि ती भावमालेच्या रूपाने आपलेसमोर उभी आहे. माझे माझे म्हणतो, काय तुझे रे येथे....पाहूना दोन दिवसाचा हेच आपले जगणे... या नियमाने आपल्या जगण्याला खरा अर्थ आहे एरवी आपण एक कफल्लक ठरतोय...हे गेली दोनवर्ष आपण सोसलय, अनुभवलय, आपण वाचलो इतरांना वाचवलय हे फार महत्वाचं....कारण बेभरवशाचं जगणं झालय...कुठे कशाचा तालमेळ नाही...फक्त आणि फक्त आपल्या हाती वास्तवाचा वेध घेऊन जीवनव्यवहार पार पाडणे एवढेच आहे. परिस्थितीने आपल्याला दाखविले आहे, आपण किती हतबल आहोत, निसर्गाने सर्व संदेश दिलेले आहेत मात्र बुद्धिवादी माणूस समजून घ्यायला तयार नाही हे आजच भिषण वास्तव आहे....मी आणि माझं घर एवढच विश्व असणारी माणसं अवतीभवती आहेत, त्यांच्या सर्वकाही मनाने व्यवहार चालतो. ही सृष्टी विधात्याने सर्वासाठी तयार केली आहे, ज्याचा त्याचा हक्क त्याला द्यावा असं माणसाला का वाटत नसावे, पर्यावरणाचा समतोल पार बिघडत चाललाय, जगणं मुश्किल होणार आहे, विनाश समोर दिसत असूनही आपण सुधारणार नसू तर...तर...निसर्गाचा काय दोष...असो.

भावमाला हा सरळ साधा अंक आजही नवोदितांना विचारमंच उपलब्ध करून देतोय....कुठलाही अभिनिवेश नाही, अट्टाहास नाही. सर्वांना सारखा न्याय....सबके लिए खुला है मंदिर यह हमारा....या राष्ट्रसंताच्या उक्तीप्रमाणे आम्ही चालतो आहोत, चालत राहू....पाहता पाहता आठवर्ष पार केली....साहित्य सोनियाच्या खाणी उपसत राहिलो, नवकवि, नवलेखक आता या चळवळीचे साक्षीदार आहेत लिहीता खुप येईल....परंतु मर्यादा ही असणारच आहे याही अंकाचे आपण असेच स्वागत कराल अशी रास्त अपेक्षा व्यक्त करतो....आपले असेच सहकार्य भावमालेला असू द्या....प्रेम द्या...परत प्रेमच मिळेल....

या निमित्ताने लिहीणारे हात मला जवळ आणता आले मानवतेचा मशाल घेऊन ही शब्दांची पालखी वाहणारे मावळे खरे तर साहित्याचे उद्गाते होत..,.कारण छोटं छोटं लिहीता लिहीताच पुढे उत्तम दर्जाच लेखन जन्माला येतय जे मानवतेची प्रेरणा असेल...अशा या अत्यंत वेगवान युगातही आपली मती ढळू न देता सत्याला साथ देणारी मानसं आम्हाला महत्वाची वाटतात...

-मुख्य संपादक
प्रोफेसर डॉ. प्रल्हाद वावरे
संपादक, भावमाला

# डॉ. सुभाष सावरकर यांच्या 'जजमेंटचे' स्थूल अवलोकन

- डॉ. दिनेशचंद्र राऊत
युवाशक्ती कला आणि विज्ञान माहाविद्यालय, अमरावती,
मो. नं. ९७६४६८८१५८

डॉ. सुभाष सावरकर यांचा दुसरा कथासंग्रह 'जजमेन्ट' हा सन् १९८१ मध्ये प्रसिद्ध झाला. या संग्रहात एकंदर सहा कथा असून 'भूलभुलैय्या' या त्याच्या कथासंग्रहातील कथांच्या तुलनेत पाहाता या कथा अधिक समाजाभिमुख व अधिक वास्तवलक्ष्यी वाटतात.

'जजमेन्ट' या शीर्षककथेची नायिका प्रा. संध्या फडके ही मनस्वी स्वतंत्र विचाराची स्त्री असून स्त्रीमुक्तीसाठी झटणारी ती एक सृजनशील लेखिका आहे. शेखर सिन्हा हा 'स्त्रीमुक्ती आंदोलन प्रतिष्ठान' चा कार्यवाह तिच्या भेटीला येतो; आणि नेहमीप्रमाणेच ती त्याच्या तारुण्यावर आणि संवादकौशल्यावर लट्टू होते. तिच्या एकेका कथेची तन्मय आत्मीयतेनं भलावण करीत तो तिचे हृदय जिंकून घेतो. दोघे परस्परांना नेहमीसाठी रेशमीरज्जूत गुंतवून घेतात. तो आला, त्यानं पाहिलं आणि जिंकलं एवढी एकच स्मृती मनात रेंगाळत ठेवून ती त्याला निरोप देते !

मात्र यानंतर दोन तीन दिवसांनी एक तरुणी एका छोट्या मुलीचं बोट धरून संध्याच्या दाराशी येते. ती 'स्त्रीमुक्ती' च्या विशेषांकात प्रसिद्ध झालेल्या 'संध्याच्या मीलन' कथेतील केंद्रीय पात्र आहे. गुणवंत राय साहेबांशी विवाह झाल्यावर आणि सोन्यासारखी कन्या पिंकी असताना सुद्धा रायसाहेबांच्या फर्मचा मॅनेजिंग डायरेक्टर निखिल याचेशी चोरटे प्रेमसंबंध प्रस्थापित करून लोणावळा-खंडाळ्याला त्याच्यासोबत प्रणयक्रिडेत गुरफटून जाते. एकदा ती दोघे बंगल्यावर प्रणयक्रिडेत मग्न असताना रायसाहेब अचानक परततात; पण नोकर बदरीच्या सहाय्याने निखिल पळून जाण्यात यशस्वी होतो. त्याच रात्री रायसाहेबांचा खून होतो आणि मृणालिनी विधवा होते. पण त्यामुळेच अखेरीस निखिल आणि मृणालिनी या दोन प्रेमी जीवांचे निरापद मीलन होते आणि पिंकी सुद्धा सुखी होते : अशी ती कथा असते. पण कथानायिका मृणालिनी प्रा. संध्याला म्हणते-निखिलने तिला धोका दिला आणि पिंकीचे भविष्य हिरावले. केवळ रूपयौवनाच्या भरवशावर.

स्त्री दुनियेला हवी तशी वाकवू शकते- अशीच धारणा मृणालिनीच्या ठायी संध्या फडके या कथा लेखिकेने बद्धमूल केली होती, त्यामुळे स्वतःच्या पायावर उभे राहाण्याची पात्रताच तिने कधी मिळवली नाही. आता ती प्रा. संध्याला विनवते की तिने पिंकीला



स्वतःजवळ ठेवून तिचे तरी भविष्य घडवावे - स्वतः मृणालिनी वाटल्यास काहीही करून स्वतःचे पोट जाळील! या मुद्यावर संध्या स्त्रीमुक्ती विचार आणि स्त्रीविषयक कणव एखाद्या झुरळासारखी झटकून देऊन त्या भयाण रात्री दोघी मायलेकींना घरून काढून लावते.

अर्ध्याच तासानंतर घाबराघुबरा बदरीप्रसाद (गुणवंतराय साहेबांचा नोकर) प्रा. संध्याच्या घरात येऊन तिचे पाय धरतो. रायसाहेबाचा खून त्याने केला नसल्याबद्दल परोपरीने विनवून सांगतो. चुकून तिजोरीतून दोन हजार रुपये घेऊन गेलेल्या बदरीने जरूर तेवढे एक हजार रुपये स्वतःच्या मुलीच्या सासरकडल्या लोकांना दिलेले असतात आणि उरलेले परत आणलेले असतात. तो ते निखिलबाबूकडे नेऊन पाहातो; पण त्याला नकार देऊन निखिल बदरीला हाकून लावतो आणि बजावतो- 'ज्याचं असेल त्याला नेऊन दे.' रायसाहेब. तर मरण पावलेले; म्हणून बदरी ते पैसे प्रा.संध्याच्या पायाशी ठेवतो. हे देखील तो प्रा.संध्याला सांगतो की रायसाहेबाचा खून निखिलने केला, कारखाना बगलेत मारला, मृणालिनीला गटवून झाल्यावर आता रायसाहेबांच्याच पैशाच्या जोरावर तो रोज नव्या बाईच्या शिकारीला निघतो : कधी तो स्त्रीमुक्तीचा सेक्रेट्री बनतो तर कधी टीव्हीचा प्रोग्रामर. कहर म्हणजे प्रा. संध्याच्या भेटीला येऊन प्रेमाचे खेळ खेळणारा शेखर सिन्हा हाच तो निखिल असतो! संध्याला ही खात्री होते; आणि तिला धक्काच बसतो. तिरीमिरीतच ती बदरीला हाकून लावते. बदरी हिरमुसला होऊन निघूनही जातो; पण जाता जाता तो त्या एक हजार रुपयांच्या नोटा तिच्या टेबलवर ठेवून तिला विनवतो तुम्हीच हे पैसे मृणालिनी बाईसाहेबांना द्या! त्या पैशांनी तिला त्या रात्री स्वस्थ झोप लागू दिली नसते.

संध्याचा जेव्हा डोळा लागला तेव्हा तिला स्वप्न दिसले- ती कोर्टात गुन्हेगाराच्या कठड्यात उभी आहे आणि फिर्यादी गुणवंत रायसाहेब तावातावाने ओरडत आहेत - जजसाहेब, हिनेच माझा खून केला! लेखकाच्या भूमिकेचा गैरफायदा घेत प्रा. संध्या फडके यांनी तिच्याच कथेतील पात्रांना त्यांच्या स्वभावधर्मांच्या विपरित हालचाली करण्याची जबरदस्ती केली; आणि कुठल्या एखाद्या शस्त्राने नव्हे तर तिच्या हातातल्या टाकाने त्याचा खून केला. एका मानवी शार्दुलाला कुत्र्याच्या मौतीनं मारलं; षंढाचं मरण दिलं.

'टाकाच्या फेकी भाल्यापेक्षाही हिंसक असू शकतात याचा हा प्रत्यक्ष पुरावा आहे म्हणून न्यायाधीश तिच्यावर रायसाहेबाचा-अर्थात् एका मिथिकल मानवरूपाचा हेतुपुरस्सर खून केल्याचा आरोप सिद्ध झाल्याचे सांगतात आणि पहिलाच गुन्हा म्हणून सहृदयतेने विचार करून कथालेखिका प्रा. संध्या फडके यांना शिक्षा देतात. आपल्या कथा नायकाच्या विकृत प्रेमात पडून रायसाहेबासारख्या जोरकस व्यक्तिमत्वाचा ज्या क्षुद्र पद्धतीने खून केला, त्याबद्दल त्यांच्याच नायकाचा टाचा घासून होत असलेला केविलवाणा मृत्यू उघड्या

डोळ्यांनी पाहाण्याची शिक्षा हे न्यायालय देत आहे.... करपस कळा ढळश्रश्र अशरीह

प्रा. संध्याला स्वप्नातून सकाळी जाग आली ती दारावर बसणाऱ्या धयांनी प्रा. संध्याला सोबत न्यायाला सी.आय.डी.चे लोक आले होते! कारण कुलाब्याच्या कोण्या उद्योगपती सैगलचा खून झाला होता आणि मयत सैगलची पत्नी, जी तिच्या छोट्या मुलीसह शेजारच्या खोलीत झोपली होती, तिच्या उशाशी सापडलेल्या 'स्त्रीमुक्ती' मासिकात मीलन प्रा. संध्या फडके लिखित कथा होती. आश्चर्य म्हणजे मीलन च्याच पद्धतीने सैगलचाही खून करण्यात आलेला होता; आणि त्याहून महत्वाचे म्हणजे मयत उद्योगपती सैगलच्या फर्मचा मॅनेजिंग डायरेक्टर शेखर सिन्हा हा इसम फरार होता! हे ऐकल्यावर संध्या त्या सीआयडीच्या लोकांसह मुकाट्याने निघाली. अर्थात एक कथालेखिका या नात्याने आपण स्वतः बेजबाबदारपणे वागलो असल्याचे, इतकेच नव्हे तर आपण लिहिलेल्या कथेचे समाजावर गैरपरिणाम होत असल्याचेही मनोमन तिच्या ध्यानात आले असल्यामुळेच!

'बहिष्कार' या कथेत मन्मथ राय या इंजिनिअर्स असोसिएशनच्या बलाढ्य कार्यकर्ता/नेत्याचा सेवामुक्तीचा आदेश आल्याचे कळताच इंजिनिअर्स बेचैन झाले असतात; आणि चीफ सुपरिटेंडेंट गुप्ता साहेबांनी कारस्थान करून उद्योग मंत्रालयात कळ फिरवून हे घडवून आणल्याचे ठावूक झाल्यामुळे त्यांचे विरुद्ध सारे इंजिनिअर्स बिथरून गेले असतात. अशोभनीय शेरा देऊन मानहानीकारक पद्धतीने मन्मथ राय यांना काढून टाकण्यात आले होते. आठच दिवसांत त्यांना क्वार्टरही सोडायला लावला होता. या उघड अन्यायाविरुद्ध बिथरलेल्या साया इंजिनिअर्सनी गुप्ताजी विरुद्ध सर्वंकष बहिष्काराचे हत्यार उपसले असते.

आर. अँड डी. च्या गुप्ताजींच्या मीटिंगमधून एका शिस्तशीर उद्धटपणाने सारे सहभागी इंजिनिअर्स उठून जातात. मीटिंगची वेळ संपताच चहाकेक घेण्याचेही सौजन्य नाकारतात. ज्युनिअर मंडळी सुद्धा शेकहँडसाठी गुप्ताजींनी पुढे केलेला हात झिडकारून निघून जाऊ लागतात. चपराशी सुद्धा जबरदस्तीने उठल्यासारखे सलाम करून सरकू लागतात.

स्वतःच्या अधिकाराचा दबदबा ठेवून कित्येक काळी कृत्ये सराईतपणे करणाऱ्या गुप्ताजींना वाटले की, थोड्याच दिवसांत असहकाराची ही वावटळही विरून जाईल. पण चहाकेक नाकारीत, बंगल्यावरचे निमंत्रणही नाकारीत हाताखालचे सर्व इंजिनिअर्स आपला असंतोष जारी ठेवतात. चारच दिवसांपूर्वी ठरलेला मेजवानीचा बेत सुद्धाच पराशाकरवी रद्द करून मि.सिन्हांनी उद्धटपणाची हद्दपार केली असल्यामुळे मिसेस गायत्रीदेवी गुप्तांनी त्याबद्दल सिन्हाला नोकरीवरून काढून टाका – असा आग्रह धरतात तरी मि. गुप्ता काहीच ॲक्शन घेत नाहीत. महिला मंडळाच्या कार्यकारिणीतून गायत्रीदेवीला उपाध्यक्षपदावरून फटक्यासरशी काढून टाकण्यात येते; जी. एम. ची पत्नी मनोरमादेवी यांची अध्यक्ष या नात्याने त्या नोटीसवर



सही असते.

गुप्ताजींच्या मुलीला – मीनाला तिचा प्रियकर मनोज स्पष्टपणे टाळू लागला असतो. 'पापी– गुन्हेगार तू नसशील पण तुझे डॅडी तर आहेतच ना!' म्हणून त्याने सुनावून सुद्धा दिले असते. एखाद्या साथीच्या रोगाने वस्तीबाहेर टाकल्यासारखे लोक त्या कुटुंबाकडे पाहू लागले होते. गुप्तासाहेब कायम घरी बसून उर्वरित वेळ घालवीत. पिकनिक-पार्टी- फिल्म शो- ब्रिजचा डाव-काही काही नाही. टी. व्ही., पॉलिस्टरच्या महागड्या महागड्या साड्या शेवटी मोलकरणीला दाखवून आणि जोरजोरात ओरडून त्यांची जाहीरात करून गायत्रीदेवी फसवे समाधान मानून घेते. पूरपीडितांसाठी बिग शॉट बुक करण्यासाठी या म्हणावं आता म्हणून ती आपली चरफड वेळोवेळी जाहीर करीत राहाते.

गुप्ताजींचा मुलगा दिनेश सुद्धा संपकरी मजुरांनाच शोभेल अशा ऑफीसर्सच्या वागणुकीवर चरफडत होता. सुट्टी घालवायला आलेल्या दिनेशला त्याच्या साऱ्या मित्रमैत्रिणींनी स्वच्छ सांगितले होते– 'माफ कर यार. पण आम्ही मजबूर आहोत.' साधं घरापर्यंत सोडायलाही ते कोणी आले नव्हते. त्याची खास मैत्रिणशीला सुद्धा स्वच्छच म्हणाली– 'क्षमा कर दिनेश, मला विसरून जा.' ती खुद्द मन्मथरायची मुलगीच ना! तिच्या वडिलांवर त्याच्या वडिलांनी लावलेल्या भयंकर आरोपांमुळे त्यांचे सारे कुटुंबच उद्धस्त होण्याच्या बेतात आले होते; मग ती तरी कशी जुळवून घेणार? आतून दुखावलेल्या दिनेशने कधी नव्हे तो गुप्तासाहेबांना जाब विचारला. कोणत्या जन्मीचा बदला घेतला त्यांचा ? गुप्ताजींनी सराईत उत्तर दिले – तुमच्याच कल्याणासाठी, तुझ्याच भल्यासाठी! गायत्रीचाही स्वतःवरचा ताबा सुटला आणि झटक्याने नवऱ्याकडे पाठ फिरवून ती म्हणाली आम्हाला नको ते कल्याण, नको असली धनदौलत नि तुमचे महत्त्वाकांक्षी मनोरे ! वसाहतीत दम कोंडून चालला आणि म्हणे प्रतिष्ठा धनदौलत नि कल्याण ! तिचं हे धारदार रूप पहिल्यांदाच पाहून गुप्तासाहेबांना धक्काच बसला.

घरचे सर्वजण आग्रह करीत असतानाही गुप्ताजी त्यांच्यासोबत पिक्चरला जात नाहीत. मानहानी, हेटाळणी, तुच्छता यांनी ते सगळीकडून कोंडी झाल्यासारखे होऊन असले तरी झाल्या चुकीची क्षमा मागण्याचे धैर्य मात्र त्यांच्यात जुळून येत नव्हते. मग काय ? बदली करून घ्यावी इथून? ... पण तरी गायत्री, दिनेश नि मीना यांचेपासून कोण सुटका देणार? आणि सर्वात भयंकर म्हणजे या गायत्रीपासून ?. ते एकटे घरीच विचार करीत राहिले.

पिक्चर पाहून आलेल्या तिघांपैकी गायत्रीला प्रथम दिसले– गुप्ताजींनी छतावरून दोर सोडून स्वतःला गळफास लावून घेतला होता. त्यांची जीभ हातभर बाहेर आली होती. स्टूल बाजूला कलंडला होता. बाजूला मन्मथ रायच्या मुलाचा – बब्बूचा नियुक्ती हुकूम

पडला होता– चिठ्ठीत दिनेशला लिहिलं होतं– 'तुझ्या वाढदिवसाची ही भेट समज!'

'इन्द्रधनुष्य' ही कथा एका मनस्वी चित्रकाराच्या आयुष्यात घडलेल्या एका नाट्यमय पण दुःखदायक अशा घटनेचे मानसचित्र सादर करणारी आहे. रघू नावाच्या या चित्रकाराने मानसिक आजारात आयुष्याची कितीतरी वर्षे काढली होती; आणि दुःस्वप्नासारख्या १८ वर्षाच्या त्या काळरात्रीनंतर आता पुन्हा त्याच्या आयुष्यात आशेची पहाट उगवली होती. त्याच्या अंतरंगात क्रांतिकारक परिवर्तन येऊन वसल्यामुळे सृष्टीचे रंगनृत्यच त्याला जिथेतिथे दिसे आणि आयुष्याची विधायक स्फूर्तीच हृदयात उचंबळून येऊ लागे. परिसरातल्या लोकांनाही त्याच्यातला हा बदल आश्चर्यविमूढ करीत होता. वेडा रघू पुन्हा माणसात आला याचा विस्मय पोरासोरांनाच नव्हे तर प्रौढांनाही तेवढाच वाटत होता.

मात्र महिनाभरातच परत मुंबईला जाण्याचा आणि उरलेला पदवी अभ्यासक्रम पूर्ण करण्याचा निर्धार त्याने व्यक्त केला तसे सारे सुन्न झाले. अखेरीस जेव्हा त्याने समजावले ६ महिन्यांची एक टर्म तेवढी केली की पदवी हाती! तेव्हा कशीबशी आईवडिलांनी मान्यता दिली. अतिशय नव्या नवलाईने तो मुंबई व्हीटीवर उतरला आणि जे. जे. आर्ट कॉलेज परिसरात दाखल झाला.

तिथे चित्रकलेच्या अंतीम वर्षाला असलेली मृणाल नावाची अतिशय गोड पोरगी त्याच्यावर लट्टू झाली ती त्याच्या रंगरेषातल्या अभिव्यक्तीची अद्‌भूतता हेरून ! तिचे चैतन्यमय लोभस व्यक्तिमत्व आणि त्याच्यात नव्याने ओसंडून आलेले प्रभातरंग–यांच्यातून त्यांची निरागस पण आत्मीयतापूर्ण जवळीक वाढली. तिचा उत्कट स्पर्श त्याला निर्मितीसाठी आव्हान देत असे, सामर्थ्य पुरवीत असे. तिच्या बर्थडेला त्यानं घरी यावं हा तिचा आग्रह त्याने मोडला नाही. आनंदात मोहोरल्या अवस्थेतच तो तिच्या घरी पोहोचला. मात्र तिने आपल्या मम्मीशी त्यांची ओळख करून देताच तो हादरला. कारण ती होती स्नेहल घोष त्याची सहपाठी मैत्रीणजिच्यापायी १८ वर्षांपूर्वी तो वेडा झाला होता. तीच होती त्याच्या – भूतकालीन यातनांची सम्राज्ञी,

मात्र यावेळेच्या धयाने तो हादरला तरी उद्धवस्त मात्र झाला नाही. कारण अंधाऱ्या गुहेतून त्याचा पाठलाग करीत येणाऱ्या हिंस्र पशूला आता त्या गुहेसमोरच्या डोंगरमाथ्यावर कमान धरलेल्या इंद्रधनुष्याने शह दिला होता. शिल्पासारख्या मूढ उभ्या स्नेहलला दोन्ही हात जोडून त्यानं अभिवादन केलं – आणि इंद्रधनुष्याच्या सप्तरंगांची उर्मी हृदयात तोलत तो खुशाल ताठ उभा राहिला. जीवनसंगरातले उत्पाती धक्के पचविण्याचे बळ त्याला अंतर्यामी समृद्ध झालेल्या कलानुभवांनी दिले, हा याचा इत्यर्थ होय.

'म्हाताऱ्याची काठी' ही कथा म्हणजे आदिवासी भागात काम करणाऱ्या एका



समाजकार्यकर्त्याची – विक्रम नावाच्या तरुणाची–समाजाप्रति / राष्ट्राप्रति असलेल्या समर्पणभावाची कहाणी होय. गावातल्या शाळेचे म्हातारे गुरुजी सेवानिवृत्त झाल्यानंतर शाळेला नवा शिक्षक घ्यायचा होता. गुरुजींचं पेन्शनही नियमित करायचं होतं. त्यासाठीच तो मंत्रालयात आला होता.

मंत्रालयातील अधिकारी–कारकुनांची उद्धट कोरडी वागणूक सोसता सोसताच त्याला बातमी कळते 'बाबूजी गेले!' ज्यांच्यासाठी आईबाप, घरशिक्षक सोडून रानभैरी झालो त्यांचं अंत्यदर्शन हे घ्यायलाच हवं म्हणून तो आश्रमला जातो. महाद्वारावर थांबतो. तिथे प्रचंड गर्दी झालेली दिसते. तिथेच त्याला पूर्वाश्रमीचा सहकारी मित्र व क्रांतिपुत्र चा तेजस्वी संपादक जयंत भेटतो. पण त्याचाही पवित्रा त्याला तेवढाच औपचारिक वाटतो. जयंत सांगतो, 'जमाना बदललाय आता... जुने आग्रह, जुने निष्ठाविषय यांना मी जऽराशी मुरड दिली आहे. त्यामुळे आपला हात तुटकपणानं त्याच्या हातातून सोडवून घेत विक्रम त्याच्याकडे पाठ फिरवून निघून जातो; आणि पुन्हा गर्दीत दाखल होतो.

एकाएकी पोलिसांचा लाठीमार सुरू होतो आणि गर्दीत विक्रम तुडवला जातो. बाहेर पडताच पोलीस त्याला अडवतात, ठाण्यात आणतात आणि डांबून ठेवतात. वेडीवाकडी दाढी आणि लंगडा पाय असलेल्या कोणीतरी माथेफिरूने नुकताच पुतळा फोडल्यामुळे पोलीस बंदोबस्त कसून असतो. ओळखपरेड होते आणि त्याच्या चारित्र्याचे सच्चेपण जाणवून विक्रमला सोडून देण्यात येते.

विक्रमला एक हडकुळा दाढीवाला वेडसर तरुण भेटतो व त्याच्या कुटुंबाच्या वाताहतीची करुण कहाणी सांगतो. त्याच्या म्हाताऱ्या बापाची काठी उडवून गुंड प्रवृत्तीच्या पुढाऱ्यांनी त्याला ठार मारले पण पोलीस त्याचा साधा रिपोर्टही घेईना. तेव्हा देवीच्या माथ्यावर हात ठेवून त्याने शपथ घेतली असते आमदाराला 'मारीन तरच दाढी काढीन. आमदाराला मारायचा प्रयत्न फसतो. गांधीबाबा शोषितांचाकी शोषकांचा ?– हे निश्चित करण्यासाठी तो गांधीजीच्या पुतळ्याच्या हातातली काठी उडवतो. तरी पुतळा पडत नाही. तेव्हा ठरते– काठीच्या आधाराची खोटीच बतावणी आहे गांधीबाबाच्या पुतळ्याची. मग तो पुतळा फोडतो. त्यात पाय दुखावला जातो. एका हातात पाय धरून नाचत सुटतो. धरपकड सुरूच असते.

पोलीस व्हॅन येताच तो झाडीत पळतो. त्याच्या मागोमाग विक्रम देखील पळतो. झोपडपट्टीच्या किनाऱ्या किनाऱ्यानं पटांगणात पोहोचतो. मावळत्या सूर्याच्या मिटत्या तेजाकडे पाहात ! सूर्याकडे पाहात संकल्प वजा निश्चय करतो 'दोन हातांनी होईल तेवढे करीन, गुरूजींची काठी होईन. सत्ता–आसनांच्या त्या भिकाऱ्यांपुढं लाचारीची भीक मागणार नाही! वस्तीतली

पहाट डोळभर पाहीन.' - आणि रान तुडवीत गावाकडे..... परत जायला निघतो. स्वयंपूर्ण होण्याच्या कृतनिश्चयासह !

'नाट्यधर्मी' या कथेचा नायक सुरेश पांडे हा प्राध्यापक आहे, नाट्यक्षेत्रातला असंतुष्ट आणि महत्त्वाकांक्षी नाटककार आणि पार्टटाईम रंगकर्मी आहे. तो लेखक आहे, दिग्दर्शक आहे आणि नटनायक सुद्धा. त्याची नाट्यसंस्था आहे. ती एकतंत्री. तो पांगळेबाबाचा भक्तही आहे. पांगळेबाबा त्याला सुचवितो. म्हणतो प्रगतीच्या मार्गात स्त्री धोंड झाली आहे. पत्नीचा सक्रिय सहभाग नाही तोवर यश नाही. त्याची पत्नी विद्या हिला नाटकात काम करण्यास सुरुवातीपासून अण्णांचा विरोध. पण सुरेश पांडे ठरवितात- विद्याला भूमिका द्यायचीच! 'रीत प्रीतिची न्यारी' हे नाटक निवडून ते स्वतः डॉक्टर (नायक) व्हायचे व विद्याला पत्नीचा रोल देण्याचे ठरवितात. मात्र विद्याला भूमिका दिल्यानंतर जगदीश दळवी या देखण्या नटाकडे ती आकर्षित होऊ लागल्याचेही त्यांच्या लक्षात येते.

मग नायक (डॉक्टर) च्या प्रेयसीची भूमिका करणाऱ्या कु. पूर्वा जोग हिला विश्वासात घेऊन ते एक योजना आखतात. नाटकाच्या तिसऱ्या अंकात पश्चात्तापदग्ध पत्नी (विद्या) जेव्हा फसविली गेल्याच्या जाणिवेने विमनस्क होऊन विष प्राशन करणार असते, तेव्हा पूर्वाच्या हस्ते तिला खरोखरीचे विष देण्यात येऊन तिचा रंगमंचावरच काटा काढण्यात येतो. मरण्याचा तो खरोखरीचा अभिनय पाहून प्रेक्षकांनी सभागृह डोक्यावर घेतले; इतकेच नव्हे तर सर्वोत्कृष्ट अभिनयाचे पारितोषिकही परीक्षक मंडळाने विद्यालाच दिले ! दिग्दर्शनाचे पारितोषिकही प्रा. सुरेश पांडे यांना मिळाले आणि योजनेच्या पुढील टप्प्यात प्रा. सुरेश पांडे अर्थातच हे कु. पूर्वा जोग यांचेशी विवाहबद्ध झाले! ही कथा तशी नेहमीच्या नाट्यक्षेत्रीय वळणाचीच असली तरी निवेदनाच्या मिश्किल व नर्मविनोदी प्रवाहिततेमुळे प्रा. सुरेश पांडे यांचे पाताळयंत्री व्यक्तित्व अभिव्यक्त करण्यात यशस्वी ठरलेली आहे.

'रक्त' या कथेतले कोठारीसाहेब हे बँकेतले संगीतप्रेमी ऑफीसर आहेत. त्यांनी तमाशा जीवनातून पळवून आणलेली बिंदू आजमितीस मालती बनून त्यांच्यासोबत वीस वर्षे संसार केलेली त्यांची पत्नी आहे. त्याचबरोबर त्यांच्या दोन मुली - अनुराधा नि सुवर्णा आहेत. मालतीबाई लावणीचे कार्यक्रम करीत गावोगावी, शहरोशहरी फिरतात आणि कोठारी साहेब आपली बँकेची कर्तव्ये सांभाळून जमेल तसे त्या कार्यक्रमांना उपस्थित राहाण्याचा प्रयत्न करतात. कन्या अनुराधा देखील उपजत गायनीकळेची देणगी असल्यागत लावणीसाम्राज्ञी बाईसोबत लावणी गाते आणि अपेक्षेहून अधिक दाद घेते. वाद्यवृंदातल्या मदनसिंगशी बाईचे चोरटे संबंध आहेत आणि कोठारी साहेबही त्या वस्तुस्थितीपासून अनभिज्ञ नाहीत. 'रक्ताचा गुण' या शीर्षाखाली त्यांनी ती बाब समंजसपणाने दाखल करून ठेवली



आहे. या बाबतीत मालतीबाईंना त्यांची एवढीच सूचना आहे की हे असलेच थेर चालू राहिलेत तर एक एक लाखमोलाचं स्थळ हातचं गमावाल आणि मग पोरींना घेऊन तमाशाचा फड उघडावा लागेल मला.

सुरेल कण्ठाची अनुराधा मर्यादशील वागणुकीची आणि निष्पाप सौंदर्याची धनीण आहे. सारी १७ वर्षांची ही मुलगी डॉक्टर होऊ घातलेल्या आनंदशी हळुहळू प्रेमबंधात गुरफटत जाते. त्या दोघांच्या लग्नाची बोलणी सर्वांच्या संमतीने सुरू आहेत आणि लवकरच त्यांच्या विवाहाची रीतसर घोषणा होणार, इतक्यात फ्रांसिस नावाचा मालतीबाईच्या वाद्यवृंदात पूर्वी असणारा उंच तगडा गिटारिस्ट डॉ. आनंदला भेटून अनुराधावर असलेल्या त्याच्या अनिवार प्रेमाची ग्वाही देतो; आणि अनुराधाशिवाय तो, तसेच त्याच्याशिवाय अनुराधा जगूच शकणार नसल्याचे आनंदला सांगतो. त्यामुळे अनुराधाबद्दल आनंदच्या मनात शंकांचे मोहोळ उठते; पण तिच्या ठाम आणि स्वच्छनितळ स्पष्टीकरणाने सारे मोहोळ नाहीसे होऊन तो निःशंक मनाने अनुराधाशी लग्न करतो. अनुराधा त्याच्या संसारात रमते- इतकी की लग्नानंतर वर्षभराने आनंद आठवडाभरासाठी दिल्लीला कॉन्फरन्ससाठी गेला असता ती माहेरी जाण्याऐवजी सासूसासरे आणि नणंद यांच्यासोबतच तो आठवडा घालवायचे ठरवते.

मात्र फ्रांसिस ज्या वाद्यवृंदात गिटारिस्ट आहे त्या यूफोनीफचे कार्यक्रम शहरात लागल्याचे अनुराधाला कळताच तिच्या अंतरंगात नकळतच कसली कसली वादळे उमळून येतात आणि तिला एकाएकी ताप चढतो. तिसऱ्या दिवशी कुठलीतरी अदृश्य खेच तिला थेट फ्रांसिसपर्यंत घेऊन जाते आणि फ्रांसिसच्या आडदांड प्रेमरागाने चिंब, संतुष्ट नि संतृप्त होऊन ती परतते. पण परतते ती अर्धमेली होऊन. तिच्या अंतरंगात घडून येणाऱ्या उत्पातांपासून ती पूर्णतः अनभिज्ञ आहे. तिच्या रक्तात उसळून उमळून आलेल्या लाटालहरींवर तिचे नियंत्रण चालत नाही; आणि संस्काराच्या दृष्टीने तर जे काही घडून चुकले ते तिला पाप वाटते. म्हणून झोपेच्या गोळ्या खाऊन ती आत्महत्या करते आणि आनंदसाठी लिहून ठेवते : इतःपर मी तुझ्या लायक नाही... माझ्या रक्ताला क्षमा कर. त्याला मी थोपवू शकले नाही, समजावू शकले नाही. या कथेत अपऱ्या अपऱ्या शब्द-फटक्यांनिशी रक्तातली परवशता व बंडखोरी अभिव्यक्त करण्यात लेखक कमालीचा यशस्वी झाला आहे.

अशाप्रकारे या सहाही कथा सामाजिक आशयाने समृद्ध असून डॉ. सुभाष सावरकरांच्या पहिल्या (भूलभुलैय्या) कथासंग्रहातील 'व्यक्ति केन्द्रित जाणिवांचा जजमेन्ट' कथासंग्रहातील समाजनिष्ठ जाणिवांनी एक प्रकारचा विकासच साधता आहे, असे स्थूलमानाने म्हणता येईल.

***